**MHKO120000132015**

## निशाण क्रमांक ८८ खालील आदेश.

( वॉल्टर परेरा वगैरे वि. अगोस्टीन परेरा वगैरे )

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ व कलम १५१, तसेच आदेश ०१ नियम १०, प्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी व आवश्यक पक्षकार यांना सामिल करणेसाठी केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार प्रस्तुतचा दावा, त्याने प्रतिवादी विरुध्द हक्कज्ञापणासाठी व कायम मनाई मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.६ यांनी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्यांच्या असणाऱ्या नावाचा गैरफायदा घेत वादीच्या अपरोक्ष व विनासंमती खरेदीपत्र क्र. १४९९/२०२० दिनांक १०/११/२०२० रोजी केले असल्याचे वादींना समजून आले आहे. त्यामुळे, वादींना त्या अनुशंगाने त्यांच्या दाव्याच्या कथनांमध्ये दुरुस्ती करणेची असुन खरेदीदार श्री. संतोष कारंडे व श्री स्टॅनी परेरा यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणेचे आहे.

०३. वादी पुढे असे कथन करतात की, त्यांना उभय पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निर्गत करणेसाठी सदरची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तसेच, सदरच्या दुरुस्तीनंतर दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसुन त्यामुळे वादी व इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट, सदरचा अर्ज नामंजूर झालेस त्यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजूर होणेबाबत वादींनी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी क्र.९१ वर दाखल केले आहे. त्यांच्या कथनांनुसार प्रस्तुतचा अर्ज खोटा व चुकीचा आहे. तसेच, प्रस्तुत दावा प्रलंबीत ठेवण्यासाठी वादींनी सदरचा खोटा अर्ज केला असल्यामुळे तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व दावा दुरुस्तीच्या अर्जाने जर

दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील पुढील अडचणी टाळणेसाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दावा दाखल झालेनंतर घडलेल्या घटनांमुळे दाखल केलेला आहे. तसेच, दावा दुरुस्तीनंतर प्रतिवादींना सुध्दा त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी मिळणार आहे.

०७. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशारितीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळणेसाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदरचा मंजूर करणे न्यायोचीत होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत अर्जात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करावी व आवश्यक पक्षकारांना सामिल करावे.

३. वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.06.13 17:12:20 +0530

स्थळ : गारगोटी. **( व्ही. बी. मुल्ला )**

दिनांक : १३/०६/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.